महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय लातुर
अंबाजोगाई रोड, लातुर- ४१३५१२ शाखा:-आस्थापना
फोन : ०२३८२-२४३००० फॅक्स : ०२३८२-२४३६३३ ई-मेल : sp.latur@mahapolice.gov.in



जा.क्र.प्रलि/आस्था/ सन २०२४-२०२५/चालक पोलीस शिपाई /२०२४-२५/२०२६/3402 लातूर दि.०८.०४.२०२६

शुध्दीपत्रक

चालक पोलीस शिपाई भरती प्रक्रिया -२०२४-२०२५

सुधारित मैदानी चाचणी व लेखी चाचणीचे एकत्रित गुणवत्ता यादी व गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय तात्पुरती निवडयादी / प्रतिक्षायादी

------०००------

लातूर जिल्हा पोलीस भरती सन २०२४-२५ मधील चालक पोलीस शिपाई पदाची गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी दि.०७.०४.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

दि.०७.०४.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या एकुण (१२) उमेदवारांना मैदानी चाचणी व लेखी चाचणीचे एकत्रित गुणवत्ता यादीत तसेच चालक पोलीस शिपाई पदाची गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी मधील एकुण (१२) उमेदवारांना (एनसीसी) " क " प्रमाणपत्राच्या आधारे ०५ गुण देण्यात येऊन एकत्रित गुणवत्ता यादी व गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली होती.

महाराष्ट्र शासन राजपत्र,असधारण भाग चार-ब, गृह विभाग दिनांक २०.१०.२०२२ च्या शासन राजपत्रामधील निर्णयान्वये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ च्या नियम ८ मधील, पोट नियम (तीन-अ) राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) क प्रमाणपत्र धारण करणारे उमदेवार, पाच अधिकच्या (बोनस) गुणांसाठी पात्र असतील असे नमुद आहे. त्यामुळे चालक पोलीस शिपाई पदाकरीता (एनसीसी) क प्रमाणपत्राच्या आधारे ५ आधिक गुणांची तरतुद नसल्याने नमुद उमदेवारांचे सदरचे ५ गुण वगळून सुधारित मैदानी चाचणी व लेखी चाचणीचे एकत्रित गुणवत्ता यादी व सुधारित गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय तात्पुरती निवडयादी / प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

चालक पोलीस शिपाई पदाची सुधारित गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय तात्पुरती निवडयादी व प्रतिक्षायादी यादीतील ही सर्व आवश्यक मुळ कागदपत्र / प्रमाणपत्र तपासणी / पडताळणीच्या आधीन राहून तयार करण्यात आली आहे. त्यामुळे सदर तात्पुरत्या निवड व प्रतिक्षायादीमध्ये उमदेवारांचा समावेश झाला म्हणुन त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येऊ नये.

सुधारित गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय तात्पुरती निवडयादी व प्रतिक्षायादी प्रसिध्द झाल्यापासुन २४ तासाच्या आत आक्षेप असल्यास या कार्यालयास लेखी स्वरुपात नोंदविण्यात यावे.

अमोल श्री. तांबे (भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक, लातूर.